# आयुष्याचा जोडीदार : अनुरूप की अनुगुण ?

प्रेम आणि आकर्षण यात फरक काय? मुलींनी मुलांषी मैत्री करायची की नाही? मुला–मुलींची निखळ मैत्री होऊ शकते का? किंवा मुले विरूद्ध मुली असे चित्र कितपत बरोबर आहे? असे एक ना अनेक प्रष्न आजच्या नवतरूणपिढीची वागणूक पाहून मनात डोकावून जातात.

आकर्षण हे वयातील सहज लक्षण होय. आकर्षण म्हणजे भावनावष होणे. चटकन् दुसऱ्या व्यक्तीच्या एखाद्याच पैलूला महत्व देणे. त्या व्यक्तीच्या विचारात मग्न होऊन इतर महत्वाच्या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष करणे. त्या व्यक्तीच्या आयुष्यात असण्या नसण्यावरच आपल्या संपूर्ण आयुष्याची किंमत ठरविणे. या उलट मैत्री म्हणजे सहवासातून वाढणारा परपरांबद्दलचा विष्वास, समान आवडी, दुसऱ्या व्यक्तीतील दोषांचा सहज स्वीकार करणे. तर प्रेम म्हणजे सतत वाढणारा परस्पर विष्वास, परस्पर समज आणि आदर, आवड–निवड आणि सर्व दोषांचा सहज स्वीकार, त्या व्यक्तीसाठी स्वतःच्या आवडी–निवडी, विचार व भावना यांच्याषी सहजपणे जुळवून घेण्याची तयारी असणे. तसेच प्रेमभावना असणाऱ्या व्यक्तीच्या सहवासात मोकळेपणा वाटणे.

यावरून हे सिद्ध होते की प्रेमात मैत्री असू शकते पण प्रत्येक मैत्री म्हणजे प्रेम नाही. आपल्या बरोबरीचा मुलगा किंवा मुलगी मैत्री जपल्याने आवडत असेल तरी प्रेम–विवाह–षरीरसंबंध या गंभीर गोष्टी आहेत. त्या योग्य वयात आणि जबाबदारीनेच व्हायला हव्यात. कुमारवयातील कोवळं मन कित्येक वेळा वरवरच्या दिखाऊ गोष्टींनी भारावून जाऊ शकते, पण आवडी–निवडी प्रगल्भ नसतात. प्रेम आंधळं असतं असं म्हंटलं तरी जोडीदार निवडणे हा आयुष्याचा प्रष्न असतो. मुलांनी किंवा मुलींनी शारीरिक आकर्षणामुळे मोहून न जाता 'जोडीदार' म्हणून ती व्यक्ती आपल्याषी प्रेमाने आणि समानतेने वागेल का, हे पाहणे जरूरीचे आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये 'आपला भावी जोडीदार कसा असावा?' हा आवडता चर्चेचा विषय असतो. अषा चर्चेतून जुळून आलेले विवाहसंबंध आकर्षणमुळेही असतात. त्यामुळे कधी–कधी ते तितकेसे दृढ होऊ शकत नाहीत आणि मग एकतर त्याची घटस्फोटात परीणिती होते किंवा लग्न टिकवण्यसाठी दोघांतील एकाला आपल्या आषा–आकांक्षांना तिलांजली द्यावी लागते. म्हणजे विवाहापूर्वी एकमेकांना अनुरूप असणारे हुषार आणि सुस्वभावी जोडपे विवाहानंतर एकमेकांपासून मनाने दूर गेले तर त्या अनुरूपतेला अर्थ उरत नाही. त्यामुळे दोघांनीही विवाहासारखा महत्वाचा निर्णय घेताना अनुरूपतेबरोबर आपण एकमेकांना अनुगुण आहोत का, हे ही पाहणे आवष्यक आहे. लग्न मोठ्यांनी ठरवून करून दिलेले असो किंवा प्रेमविवाह असो, एक गोष्ट नक्की की आकर्षण–मैत्री–प्रेम–विवाह या गोष्टी अगदी स्वाभाविक आहेत आणि कोणत्या ना कोणत्या वळणावर त्या प्रत्येकाच्या आयुष्यात येतातच. तितका काळ सद्सद्विवेकबुद्धी आणि परस्थितीचे तारतम्य बाळगून पार पडला तर आयुष्य नक्कीच सुखावह होते.

डॉ. सौ. प्राजक्ता कडूसकर